डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली जि.—रत्नागिरी

विद्यापीठाच्या क्रिडांगणावर संपन्न होणाऱ्या
आंतरविद्यापीठ क्रिडा स्पर्धा क्रिडा महोत्सव—२०१७ करिता
भोजन व्यवस्था करणे

भोजन व्यवस्थेसाठी
ई निविदा

नमुना— 'ड'

भाग १ — ई निविदा सुचना, अटी शर्ती आणि सविस्तर माहिती
भाग २ — निविदा अटी व शर्ती
भाग ३ — कामाचे बाब वर्णन
भाग ४ — चहा, अल्पोपहार, भोजन दरपत्रक

दुरध्वनी क्रमांक: ०२३५८—२८०५४१

अध्यक्ष,
भोजन व्यवस्था समिती
क्रिडा महोत्सव—२०१७
डॉ.बा.सा.कोकण कृषिविद्यापीठ, दापोली
ता.दापोली, जि.रत्नागिरी

# डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी

जा.क्र डॉ.बासाकोकृवि/मृदरशा/क्रिडा महोत्सव/४६९/२०१७ दिनांक : २२/०९/२०१७

## ई—निविदा सूचना

अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती तथा प्रमुख, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग,डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी यांचेकडूनखालील कामासाठी''ड'' नमुन्यामध्ये (व्दि—लखोटा पध्दत) **ई—निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन)** निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसारा बयाणा रक्कम | भोजन व्यवस्था देण्याची तारीख | प्रत्येक ई—निविदा संचाची रक्कम ना परतावा |
|---|---|---|---|---|
| १ | **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे आंतर कृषि विद्यापीठे ''क्रिडा महोत्सव २०१७'' करीताभोजन व्यवस्था व इतर अनुषंगीत कामे करणे.** | ६०,०००/- | २६.११.२०१७ ते ०२.१२.२०१७ | १०,०००/— |

## ई—निविदेचे वेळापत्रक

| अ. क्र. | डॉ.बा.सा.कोंकण कृषि विद्यापीठाकडील कार्यवाही | कंत्राटदार/ठेकेदाराकडील कार्यवाही | दिनांक व वेळ पासून | दिनांक व वेळ पर्यंत | लखोट्याबाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ई—निविदा प्रसिध्दी | —— | **०३.१०.२०१७ वेळ १३.०१** | — | —— |
| २. | —— | ई—निविदा डाउनलोड करणे | **०३.१०.२०१७ वेळ १३.०१** | **१७.१०.२०१७ वेळ १७.३०** | तांत्रिक व आर्थिक लखोटा |
| ३. | —— | ई—निविदा तपशिल तयार करणेसाठी कालावधी | **०३.१०.२०१७ वेळ १३.०१** | **१७.१०.२०१७ वेळ १७.३०** | वरील प्रमाणे |
| ४. | तांत्रिक लखोटा बंद करणे | —— | **१७.१०.२०१७ वेळ १७.३१** | **१७.१०.२०१७ वेळ १७.४५** | वरील प्रमाणे |
| ५. | आर्थिक लखोटा बंद करणे | —— | **१७.१०.२०१७ वेळ १७.३१** | **१७.१०.२०१७ वेळ १७.४५** | वरील प्रमाणे |
| ६. | —— | ई—निविदा ऑनलाईन सादर करणे | **१७.१०.२०१७ वेळ १७.४६** | **२५.१०.२०१७ वेळ २३.००** | वरील प्रमाणे |
| ७. | तांत्रिक लखोटा उघडणे **(शक्य झाल्यास)** | —— | **२६.१०.२०१७ वेळ १०.००** | **२७.१०.२०१७ वेळ १७.४५** | तांत्रिक लखोटा |
| ८. | आर्थिक लखोटा उघडणे **(शक्य झाल्यास)** | —— | **२६.१०.२०१७ वेळ १०.००** | **२७.१०.२०१७ वेळ १७.४५** | आर्थिक लखोटा |

## भाग—१

**टिप:** तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृपया अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती व प्रमुख, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी **(फोन नं.०२३५८—२८०५४१/ मो.नं. ९४२१२३५०९४)** कार्यालयास करण्यात यावी.

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी सविस्तर निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal maharashtraetenders.in / adf.maharashtra.etenders.in वर मदत व संपर्क करणे आवश्यक आहे.

२ निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा सादर करणे संदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी Sify Technologies Ltd. Pune दुरध्वनी क्रमांक. ०२०—२५३१५५५५ येथे संपर्क साधावा.

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४. इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५ वरील कामांची सविस्तर सुचना www.dbskkv.org/maharashtraetenders.in किंवा df.maharashtra.etenders.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६. तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृपया अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती व प्रमुख, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी **(फोन नं. ०२३५८—२८०५४१/ मो.नं.९४२१२३५०९४)** कार्यालयास करण्यात यावी. तसेच तांत्रिक तसेच इतर अनुषंगीक माहितीबाबत काही शंका असल्यास किंवा अधिक माहितीकरीता दि.१०/१०/२०१७ रोजी १०.०० वाजता निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयात उपस्थित राहवे किंवा संपर्क साधण्यात यावा.

**सहि/—**
**अध्यक्ष,**
भोजन व्यवस्था समिती,
क्रिडा महोत्सव—२०१७व
**प्रमुख,**
मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली

## भाग—२

## <u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>

१. खालील प्रमाणे ठेकेदारांनी ई—निविदेची कागदपत्रे शासकीय संकेतस्थळावर अपलोड करावीत.
   **१. उपाहारगृह व्यवसाय परवाना पत्र / अन्न भेसळ विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र**
   **२. जी.एस.टी प्रमाणपत्र**
   **३. पॅनकार्ड**
   **४. शासकीय व निमशासकीय विभागांतर्गत भोजन व्यवस्थेप्रकारची कामे केल्याचे संबधीत विभागाने दिलेली प्रमाणपत्रे**
   **६.ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याचे रू.१००/—(रू.शंभर) मात्र बॉन्ड पेपरवरील स्वतंत्र प्रतिज्ञापत्र.**

२. **शासकीय धोरणान्वये ई—निविदेची कागदपत्रे ही ऑनलाईन सादर करावयाची असल्याने ई—निविदा करीता सादर करावयाची कागदपत्रे कार्यालयात लखोट्यामध्ये पुन:श्च सादर करण्याची आवश्यकता नाही.**

३. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस—२०१४/प्र.क्र. ८२/भाग ।।।/उद्योग—४, दि. ३० ऑक्टोबर २०१६ मधील नियम क्रमांक ३.१.२.१ व ३.१.२.२ मध्ये नमुद केलेल्या खरेदी प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ समिती मार्फत निविदाधारकांकडून प्राप्त झालेल्या देकारांचा वाजवीपणा निश्चित आणि स्थापित करण्यासाठी त्यांचे निविदेमध्ये नमुद कलेले दर/किंमत वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किमतीनुसार आणि व्यावसायिक पद्धतीने तपाससण्यात येतील व ते विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या निर्णयानुसार अंतिम राहतील. म्हणून निविदाधारकाने निविदेमध्ये दर/किंमत नमुद करताना वरील बाबींचा अभ्यासपुर्वक विचार करून मेनुप्रमाणे वाजवी दर नमुद करावेत.

४. ज्या कंत्राटदाराने यापूर्वी एखाद्या शासकीय/निमशासकीय संस्थेच्या ३००० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या सलग पाचदिवसांचा भोजन व्यवस्थेचे कार्यक्रम (अल्पोपहार, चहा, दुपारचे व रात्रीचे भोजन) यशस्वीरित्या पार पाडले आहेत अशा कंत्राटदाराने काम केलेल्या संबंधित संस्थेचे अनुभवाचा दाखला निविदेसाबत जोडणे बंधनकारक आहे व असे प्रमाणपत्र असणारा पुरवठाधारकाच निविदेतील दर उघडण्यास पात्र राहील.

५. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांच्या पूर्ततेबाबत आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष **मुळ कागदपत्रांची** पहाणी करणेत येईल. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांची सत्यता व अन्य तपासणी असमाधानकारक आढळणाऱ्या निविदाधारकाची निविदा रद्द करुन त्याबाबत कोणत्याही प्रकारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

६. सदर कामाची ई—निविदा फॉर्म फी निविदा फॉर्म डाऊनलोड करणेपूर्वी ऑनलाईन पध्द्तीने जमा करावी लागेल तसेच इसारा रक्कम देखील ऑनलाईन पध्द्तीने जमा करावयाची आहे. ठेकेदाराने सर्व रक्कमा या ऑनलाईन पध्द्तीने जमा करावयाच्या आहेत. **ई—निविदा फॉर्म फी/इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेमधुन कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत मिळणार नाही.** तसेच सदर बाबत कोणत्याही प्रकारची रक्कम ही प्रत्यक्षात विद्यापीठाच्या कोणत्याही खात्यामध्ये बॅकेव्दारे जमा करावयाची नाही. म्हणजेच सर्व व्यवहार हा डेबीट किंवा क्रेडिट कार्ड व्दारेच करावयाचा आहे. बॅक कमीशन किंवा बॅकेचे इतर चार्जेस वजा जाता या कार्यालयाची निविदेची बयाणा आणि निविदा संचाची किंमत येणे आवश्यक आहे.

७. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई—निविदा प्रणालीचे मुख्य संकेतस्थळmaharashtraetenders.inकिंवाdf.maharashtra.etenders.inयेथे नोंदणी करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीयेत सहभागी होणाऱ्या ठेकेदारांना ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी **रु. १,०९२/—** मात्र प्रति निविदा ऑनलाईन जमा करावे लागतील. सदरहू रक्कम ठेकेदाराने ई—निविदा Decryption/Re-encryption करणेचे कालावधीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

८. खाद्यपदार्थ गुणवता तपासणी समितीने निश्चित केलेल्या धान्य व किराणा सामुग्रीचा आवश्यक साठा कार्यक्रमाच्या तीन दिवस अगोदर म्हणजेच दि. २३.११.२०१७ रोजी कार्यक्रमस्थळी आणून, त्याची विद्यापीठ नियुक्त तज्ञ समिती मार्फत गुणवत्ता तपासणी व योग्य प्रमाणात धान्य व किराणासाठी असल्याची खतरजमा करून घेणे बंधनकारक राहील. सदरील समितीस गुणवत्तेबाबत व आवश्यक धान्य व किराणासाठया बाबत साशंकता आढळल्यास सदरील कंत्राटदारावर कार्यवाही करण्याचे अधिकार भोजन समितीने राखुन ठेवले आहेत.

९. अतिथी, विद्यार्थी, पंच यांना पुरविण्यात येणाऱ्या खद्यपदार्थाच्या गुणवत्तेबाबत विद्यापीठाच्या खाद्य पदार्थ गुणवत्ता तपासणी समितीस तक्रार केल्यास तात्काळ त्याबाबत समिती मार्फत तपासणी करून सदर भोजन निकृष्ट असल्याचे आढळल्यास, संबंधीत कंत्राटदाराची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

१०. कंत्राटदारास सर्व खाद्य व पेय पदार्थ उत्कृष्ट, आरोग्य वर्धक व चांगल्या मालापासून निर्मित करणे अनिवार्य आहे. तसेच भोजन निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणार साहित्य (भांडी) स्वच्छ व मुबलक प्रमाणात असणे आवश्यक आहे.

११. सदर खाद्य व पेय पदार्थाचे सेवन केल्याने आरोग्यास कुठलाही धोका अथवा हानी पोहोचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. व त्यानुसार कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात येईल.

१२. भोजन व्यवस्थेतील सर्व पदार्थ अमर्यादित स्वरूपात पुरवावे लागतील.

१३. भोजनासाठी गोड पदार्थ हे वनस्पती तुपामध्ये (सनफ्लावर ब्रॅड) व इतर पदार्थ हे भुईमुगाच्या डबल फिल्टर खाद्य तेलामध्ये तयार करावे लागतील. भात तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा तांदुळ हा उच्च प्रतिचा ब्रॅडेन्ड सुवासिक तांदुळ वापरणे अनिवार्य आहे. तसेच भोजन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे इतर सर्व साहित्य हे नामांकित कंपनीचे Agmarkप्रमाणित सीलबंद व उच्च प्रतिचे वापरणे बंधनकारक आहे.

१४. खाद्य पदार्थ वाढण्यासाठी व सुरळीत अन्नपुरवठा वाटप करण्याकरीता स्वच्छ गणवेश (हात मोजे घातलेले, डोक्यावर टोपी असलेली) मितभाषी व चांगली वेशभुषा असलेले अंदाजे १२५ ते १५० सेवक असणे आवश्यक आहे.

१५. चहा, अल्पोपहार व भोजनासाठी मुले व मुली आणि अधिकारी यांच्यासाठी वेगवेगळया दोन ठिकाणी किंवा आदेशीत केल्याप्रमाणे व्यवस्था करणे बंधनकारक आहे.

१६. दि. २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१७ या कालावधीत १०० अतिमहत्वाच्या सन्माननिय अतिथींच्या भोजनाची वेगळी व्यवस्था करावी लागेल.

१७. भोजन व्यवस्थेसाठी लागणारे बुफे टेबल, त्यावरील स्वच्छ कापड, टेबल सजावट उपलब्ध करून देणे इत्यादी कामे कंत्राटदारास करावी लागतील.

१८. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

१९. सेवा पुरविणाऱ्या सेवकामध्ये बालमजुरांचा समावेश असु नये.

२०. कंत्राटदाराने खाद्य व पेय पदार्थ निर्मितीकरीता आवश्यक असणारे सिलेंडर व तत्सम ज्वालाग्राही साहित्याची योग्य निगा ठेवावी. कोणत्याही विस्फोटक पदार्थाची हाताळणी व उपयोग करतांना कुठलीही दुखापत विद्यार्थी, कर्मचारी इत्यादींना झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. कंत्राटदारानी भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी पुर्णक्षमतेची अग्नीक्षमक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

२१. कंत्राटदारास प्रत्येक विद्यार्थी अथवा व्यवस्थापकास विद्यापीठाद्वारे पुरविण्यात आलेल्या कुपनाच्या आधारेच खाद्य व पेय पदार्थ पुरवावे लागतील, अंतिमरीत्या एकूण प्राप्त कुपनाच्या आधारावर देयकाची अदायगी केली जाईल.

२२. कंत्राटदाराद्वारे वापरल्या जाणाऱ्या दुधाचा दर्जा दररोज विद्यापीठ अधिकाऱ्यामार्फत लॅक्टोमीटरद्वारे तपासण्यात येईल.

२३. खाद्य पदार्थ निर्मिती करीता मिनरल वॉटर चा वापर करावा तसेच अल्पोपहाराच्या व भोजनाच्या वेळेस सर्व विद्यार्थी, पंच व अधिकारी यांना मिनरल वॉटर पुरविणे बंधनकारक राहील.

२४. विहीत वेळेत सर्व विद्यार्थी, अधिकारी वर्गास रूचकर, गरम चहा/कॉफी/दुध, अल्पोपहार व भोजन पुरविणे अनिवार्य आहे.

२५. सदरील स्पर्धेसाठी येणारे हे विद्यार्थी असल्याने सर्व खाद्य पदार्थ प्रमाणबद्ध तिखटामध्ये निर्मीती करणे आवश्यक आहे.

२६. भाजी, अंडी, दुध, दही, ब्रेड, उसळ व पनीर आदी साहित्य ताज्या स्वरूपाचे वापरणे अनिवार्य आहे.

२७. दिनांक २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१७ पर्यंत खाद्यपान सेवा सर्व भांडी, इतर साहित्य तसेच स्वयंपाक करण्याचा व वाढण्याचा जागा स्वच्छ ठेवावी लागेल व संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२८. इच्छुक कंत्राटदारांनी निविदा भरण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यस्थळाची पाहणी व कामाचे स्वरूप समजावून घेणे अपेक्षित आहे.

२९. शासन निर्णय दि. ३०/१०/२०१५ मधील नियम ३.१.२४ मध्ये नमुद केलेले सर्व कर कंत्राटदारास भरावे लागतील.

३०. दि. १ जुलै, २०१७ पासून वस्तु व सेवाकर लागू झाल्यामुळे शासननिर्णयानुसार त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे व त्यानुसारच तो सेवाकर कपात करण्यात येईल.

३१. निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखा मधील बदलाबाबत विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील.

३२. सदरील निविदे संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास ते दापोली न्यायालय अंतर्गत राहुनच सोडविण्यात येतील.

३३. कोणतीही निवीदा मंजुर करणे अथवा सर्व निविदा ना—मंजुर करून पुर्ननिविदा करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

३४. शासन निर्णय क्र. बीसीए.२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७—अ, दिनांक १७/६/२०१० अन्वये कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अनुषंगाने ठेकेदाराचे देयकामधून देयकाच्या रक्कमेच्या १ टक्का लेबर सेस वसूल करण्यात येईल.

३५. ठेकेदाराने त्यांचे कामावर नेमणेत येणाऱ्या मजूरांचा विमा हा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यापोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार बिलामधून विम्यापोटी येणाऱ्या रकमेची वजावट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

३६ खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

**a) G.S.T. . शासनाचे निर्देशानुसार जी.एस.टी. कराची टक्केवारी ठेकेदाराचे देयकामधून वजावट करणेतयेईल व हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.**

**b) Income tax - As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India**

**c) Labour Insurance - 0.5 / 1.0 % will be deducted from the bills**

**d) Labour cess - 1.0 % will be deducted from the bills.**

३७ निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादरीकरण करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा—Sify Techonoligies Ltd., Nextender (India) Pvt. Ltd. (020) 25315555,Email:-support.gom@nextenders.com

३८ निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

३९ ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळुन येतील अशा निविदाकाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

**४० ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास रू १००/— मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर (बॉन्ड पेपर) या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करून द्यावा लागेल.**

४१ इतर अटी व शर्ती ई—निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

४२ निविदेमधील कामे ही कालमर्यादित असल्याने कार्यादेश दिल्यापासून सदरची कामे विहीत मुदतीमध्ये पूर्ण करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

४३ शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे रहातील.

४४ सहाय्यक आयुक्त अन्न आणि औषध प्रशासन, (महाराष्ट्र शासन) यांचे व्यवसायाचे परवाना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४५ भोजन व्यवस्था कोकण कृषि विद्यापीठाच्या परिसरात स्पर्धेसाठी आलेल्या पुरूष खेळाडूंची भोजन व्यवस्था कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयानजिक तसेच महिला खेळांडूची भोजन व्यवस्था विद्यार्थीनी वसतीगृह मध्ये व इतर सर्व अतिथी, निमंत्रित व अधिकारी/कर्मचारी यांची भोजन व्यवस्था बेकरी समोर करायची आहे. ताटे, वाटया, ग्लास, हात धुण्यासाठी बेसिन, बुफे काऊंटर (आवश्यक त्या मांडणी साहित्यासहीत) यांची व्यवस्था ठेकेदाराने करावयाची आहे.

४६. भोजन तयार करणेसाठी पाणी आणि विज यांचा पुरवठा विद्यापीठामार्फत होईल

४७. गरम जेवण देण्याची व्यवस्था बंधनकारक आहे.तसेच खाद्य पदार्थाव्दारे जीवीतास हानी पोहचेल असे प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी खाद्य प्रबंधकाची राहील किंवा असे प्रकार निदर्शनास आल्यास दंडात्मक कार्यवाही करणेबाबत शिफारस करण्यात येईल.

४८. खाद्य प्रबंधकाने वरील कार्यक्रमादरम्यान त्याच्या कार्यक्षेत्राशी संबधीत असलेल्या स्थानिक प्राधीकरणाच्या सर्व परवानग्या स्वत: प्राप्त करुन घेवून त्या निम्नस्वाक्षरीकारांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४९. सदर क्रिडा महोत्सव—२०१७ कार्यक्रम माहे २६ नोव्हेंबर २०१७ ते ०१ डिसेंबर २०१७ या कालावधीत साजरा होणार आहे.

अधिक माहितीसाठी अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती आणि प्रमुख, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी **(फोन नं. ०२३५८—२८०५४१/ मो.नं.९४२१२३५०९४)**,यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

**सही/—**
**अध्यक्ष,**
भोजन व्यवस्था समिती,
क्रिडा महोत्सव—२०१७व
**प्रमुख,**
मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि
विद्यापीठ, दापोली

**प्रत विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहितीसाठी सविनय सादर**

**प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१. मा.कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर

२. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, सर्व्हे नं. १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

२/— यांना कळविण्यात येते की, प्रस्तावित निविदा उघडण्याच्या तारखेला कृपया आपला प्रतिनिधी पाठवावे हि विनंती.

३. शिक्षण संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

४. संशोधन संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

५. संचालक विस्तार शिक्षण, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

६. नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

७. क्रिडाधिकारी, डॉ.बाळसाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली

८. कार्यक्रम प्रमुख, क्रिडा महोत्सव २०१७ डॉ. डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

९. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात यावी.

१०. नोटीस बोर्ड, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**भाग -३ अ कामाचे बाब वर्णन**

२१ वी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा

**क्रीडा महोत्सव -२०१७**

अंदाजे ३००० ते ३२०० व्यक्तींसाठी अमर्यादित नाष्टा, दुपारचे जेवण, चहा आणि रात्रीचे जेवण मेनूप्रमाणे

| दिनांक | सकाळचा अल्पोपहार (७.०० ते ९.३० वाजता) | दुपारचे भोजन (१२.०० ते १५.०० वाजता) | चहा (१६.०० ते १७.३० वाजता ) | रात्रीचे भोजन (२०.०० ते २२.३० वाजता ) |
|---|---|---|---|---|
| २६/११/२०१७ | पोहे,शेव, चहा, कॉफी दूध, अंडी, केळी, ब्रेड, बटर, जॅम, | चपाती, कोबीची भाजी, डाल फ्राय, पांढरा भात, ठेचा, कोशिंबीर, लोणचे | चहा, बिस्कीट | चपाती, पुरी, आलू मटर, खिचडी, कढी, पांढरा भात भजी, जिलेबी, छोले मसाला ताक, फ्राय पापड, शेंग चटणी कांदा सॅलेड, लोणचे |
| २७/११/२०१७ | चहा, कॉफी, दूध, अंडी, केळी, ब्रेड, बटर, जॅम, उपमा, चटणी, शेव, मिसळ पाव | चपाती, पराठा, पनिर बटर मसाला, बैगन मसाला, डाल फ्राय, पांढरा भात, बुंदि रायता, मसाला शेव, गूलाब जामुन, ताक, सॅलड, लोणचे, पापड, ठेचा | चहा, बिस्कीट | चपाती, भाकरी, व्हेज बिर्यांनी, पांढरा भातचिकन मसाला/फीश,पावटा उसळ, भरलेली भेंडी सोलकढी, सॅलेड,, लोणचे, पापड, ठेचा |
| २८/११/२०१७ | चहा, कॉफी, दूध, अंडी, केळी, ब्रेड, बटर, जॅम, पोहे, इडली सांबर, मेदूवडा सांबर, चटणी, ऑम्लेट | पुरणची पोळी, कटाची आमटी, पुरी दम आलू, दूध, तुप, कढी, ताक, पापड, कुरडई, शेंगदाणा चटणी, सॅलेड, लोणचे, पांढरा भात | चहा, बिस्कीट | पुरी,चपाती, भरलेली वांगी, चणा मसाला, तवा भाजी (मिक्स), मुग भजी, जिरा राईस, पांढरा भात, बर्फी, पापड, कढी |
| २९/११/२०१७ | चहा, कॉफी, दूध, अंडी, केळी, ब्रेड, बटर, जॅम,बटाटा वडा सांबर, शिरा, व्हेज सॅण्डविच, ऑम्लेट | चपाती, मसाला पुरी, मिक्स डालफ्राय, पनिर भुरजी, व्हेज कोल्हापुरी, व्हेज पुलाव, पांढरा भात, मुग हलवा, ताक, मिक्स नमकिन डिस्को पापड, कोशिंबीर,लोणचे,ठेचा | चहा, बिस्कीट | चपाती, भाकरी, पुरी, कोफ्ता करी, राजमा, भरलेली भेडी, व्हेज रायता, चिकन रस्सा, फीश (सुरमई/बांगडा), ग्रिन हैद्राबादी राईस, चिकन बिर्यानी, पांढरा भात, मॅगो बर्फी, सोलकडी, सॅलेड |
| ३०/११/२०१७ | चहा, कॉफी, दूध, अंडी,केळी, ब्रेड, बटर, जॅम, मटकी उसळ पाव, पोहे, ब्रेड पकोडा, ऑम्लेट | चपाती, पुरी पालक पनिर , मिक्स व्हेज, डालफ्राय, भजी, आम्रखंड, ताक, तिळचटणी , टोमॅटो काकडी सॅलेड, पांढरा भात, लोणचे, पापड | चहा, बिस्कीट | चपाती, पुरी, भाकरी, चिकन, फीश (सुरमई/बांगडा), व्हेज कुर्मा, गवार मसाला, डालफ्राय, फ्राईड राईस, पांढरा भात, गाजर हलवा, सोलकडी, कोशिंबीर |
| ०१/१२/२०१७ | चहा, कॉफी, दूध, अंडी,केळी, ब्रेड, बटर, जॅम, कुर्मा पुरी भाजी, शिरा, ढोकळा, ऑम्लेट | चपाती, पुरी चवळी उसळ, बटाटा भाजी, बैगन भरता, व्हेज पुलाव, रसगुल्ला, खिर, ग्रिन सॅलेड, ग्रिन चटणी, लोणचे, पापड, पांढरा भात | चहा, बिस्कीट | चपाती, पुरी, भाकरी, झुणका, व्हेज कोल्हापुरी, बालूशाही, खारीबूंदी, सॅलेड, ठेचा, लोणचे, पांढरा भात |

टिप :—अ) पिण्यासाठी मिनरल वॉटर पुरविणे आवश्यक आहे.

ब) आदल्यादिवशी पुढच्या दिवशीच्या ताटांची संख्या सांगितली जाईल.

दरपत्रक :—१) सदरच्या मेनूचा विचार करून प्रति व्यक्ती प्रति दिनीयेणाऱ्या खर्चाचा दर नमूद करावा.

निविदा धारकाची स्वाक्षरी आणि शिक्का

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,दापोली,
# जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)
# क्रीडा महोत्सव -२०१७

**भाग -४**

चहा , अल्पोपहार, भोजन दरपत्रक

(दि. २६ नोव्हेंबर २०१७ ते १ डिसेंबर २०१७, या सहा दिवसांच्या कालावधीसाठी)

| अ.क्र. | प्रकार | एकत्रीत दर (रूपये)अंकी प्रती दिवस प्रती व्यक्ती | एकत्रीत दर (रूपये)अक्षरी प्रती दिवस प्रती व्यक्ती |
|---|---|---|---|
| १ | नाष्टा मेनुप्रमाणे (अंदाजे ३००० ते ३२०० व्यक्तींसाठी) | | |
| २ | दुपारचे जेवण मेनुप्रमाणे (अंदाजे ३००० ते ३२०० व्यक्तींसाठी) | | |
| ३ | चहा /कॉफी मेनुप्रमाणे (अंदाजे ३००० ते ३२०० व्यक्तींसाठी) | | |
| ४ | रात्रीचे जेवण शाकाहारी/ मांसाहारी मेनुप्रमाणे (अंदाजे ३००० ते ३२०० व्यक्तींसाठी) | | |

टिप: उपरोक्त मेनू प्रमाणे भोजन पुरविण्याचे दर नमुद करताना त्यामध्ये वस्तु व सेवा (GST) करासह दर नमुद करण्यात यावेत.

निविदा धारकाचे नांव:
स्वाक्षरी व शिक्का

# नमुना— ड
# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली, जि. रत्नागिरी

| *टिपणी* | *सामग्रीचा पुरवठा निविदा व शर्ती* |
|---|---|
| १. निविदा स्विकारण्यांत आली तर वेगळया कराराची आवश्यकता नाही आणि प्रत्यक्ष निविदा हेच कंत्राट म्हणून समजण्यांत येईल. | मुद्रांक शुल्कातून सूट मिळावी पहा शा.नि.क्र. ३६८—क—१७३२, दिनांक ९ ऑक्टोबर १९८९ |
| २. निविदेवरील स्वाक्षरीसाठी पहा, नियम १ | |

## *कंत्राटदारांच्या मार्गदर्शनासाठी सर्वसाधारण नियम व निर्देश*

१. अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती व प्रमुख, मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीकिंवा त्याचा रीतसर प्राधिकृत समिती सदस्य, ज्यांनी निविदा सादर केल्या असतील त्या कंत्राटदारांच्या किंवा त्या वेळी उपस्थित असलेल्या, प्रतिनिधींच्या निविदा उघडतील आणि ती योग्य प्रपत्रानुसार तौलनिक विवरणात निरनिराळया निविदांच्या रक्कमांची नोंद करील. निविदांबरोबर पाठवलेल्या इसारा रक्कमेच्या पावत्या ती रक्कम मिळेल त्या दिवशी कंत्राटदारांना देण्यात येतील. निविदा स्विकारली गेल्यास ओळख पटविण्यासाठी प्रयोजनासाठी कंत्राटदार विनिर्देशांच्या प्रतीवर व आवश्यक असतील अशा अन्य दस्तऐवजावर स्वाक्षरी करील. निविदा नाकारली गेल्यास निविदा पाठवणाऱ्या कंत्राटदाराला अनामत ठेवलेली इसारा रक्कम, पैसे भरणा केल्याची पावती त्यांने दिल्यावर परत करणेंत येईल

२. निविदा निकालात काढण्यांस सक्षम असलेल्या अधिकाऱ्याला सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही निविदा नाकारण्याचा अधिकारी असेल.

# *भोजन व्यवस्थेसाठी निविदा*

मी किंवा आम्ही, ———————————————————————————————— खाली सही करणार, आम्ही ——————————————————————————.——— जोडलेले अनु—सुचित वर्णिलेल्या भोजन व्यवस्थेसाठी सोबत जोडलेल्या शर्तीच्या अधिनतेसाठी निविदा पाठवित आहे/आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| क) | अनेक दुय्यम कामे अंतर्भुत असल्यास त्यांचा तपशील निराळ्या सूचीत दिला पाहिजे | क) | सर्वसाधारण वर्णन | |
| ग) | निविदा सादर करतेवेळी इसारा रक्कम ऑनलाईन भरणे | ग) | विद्यापीठ खात्यात धनादेशाव्दारे भरावयाची इसारा रक्कम रूपये: | ६०,०००/— |
| घ) | तारण अनामत<br>सुरक्षा अनामत रक्कम | घ) | तारण — अनामत<br>१. रोखे इसारा— रक्कमेहून कमी नाही इतकी रूपये: | १,५०,०००/— |
| | | | **एकूण रूपये** | २,१०,०००/— |

(स्वाक्षरी)
(पत्ता)

**अध्यक्ष,**
**भोजन व्यवस्था समिती,**
क्रिडा महोत्सव—२०१७व
**प्रमुख,**
मृदशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली